1 9 SEP 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उभारले विद्यार्थी विकासचे वसतिगृह

लोकमत न्यूज नेटवर्क



शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृहाची इमारत उभारली असून, याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी झाले.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृहाची इमारत उभारली असून, याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या इमारतीच्या तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून तिचे क्षेत्रफळ ७७१.७९ चौरस मीटर इतके आहे. येथे एका डॉर्मिटरीसह एक उपाहारगृह आणि ४ स्वच्छतागृहे आहेत. साठ विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय येथे होऊ शकते.

विद्यापीठात विविध महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रमांसाठी संलग्नित महाविद्यालये आणि राज्यासह देशभरातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र इमारत असावी, अशी मागणी विद्यार्थ्यांतून होती. त्याची दखल घेत विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सदर इमारत बांधण्यात आली.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आर्डेकर, शिवकुमार ध्याडे उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी सर्वांचे आभार मानले.

1 9 SEP 2025
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवास मिरजेत प्रारंभ

## तीन जिल्ह्यातील दोन हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**मिरज** : मिरजेत शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे उद्घाटन आमदार सुरेश खाडे यांनी केले. मिरजेत होणाऱ्या युवा महोत्सवातून अनेक गायक, वादक, कलाकार घडणार असल्याचे आमदार खाडे यांनी यावेळी सांगितले.

तंतुवाद्याचे माहेरघर, संगीतपंढरी व कलानगरी म्हणून ओळख असणाऱ्या मिरजेत ३३ वर्षानंतर साळुंखे महाविद्यालयात, शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव होत आहे. युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील २०० महाविद्यालयातील २ हजार विद्यार्थी सहभागी आहेत. तीन दिवसांच्या कालावधीत वैयक्तिक व सांघिक अशा ३६ विविध कलाप्रकारांत स्पर्धा होत आहेत.



मिरजेत शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात महाविद्यालयीन स्पर्धकांनी ढोल-ताशा पथकाचे सादरीकरण केले

उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील होते. ते म्हणाले, युवा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. भारतीय संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याचे काम विद्यापीठ करत आहे. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी आमदार इद्रिस नायकवडी, डॉ. आर. डी. ढमकले, अ‍ॅड. एस. जी. परुळेकर, डॉ. टी. एस. चौगले, डॉ. एस. डी. जाधव, डॉ. देवानंद सोनटक्के, डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य प्रकाश हाके, किशोर जामदार, विजयराव धुळबुळू उपस्थित होते.

## युवा महोत्सवात होणारे कार्यक्रम

महोत्सवात पहिल्या दिवशी लोकसंगीत वाद्यवृंद, लोककला, प्रहसिका, एकांकिका, पथनाट्य, वक्तृत्व, वादविवाद, शास्त्रीय नृत्य, एकपात्री अभिनय, लघुपट आदी स्पर्धा पार पडल्या. शुक्रवारी पाश्चिमात्य व भारतीय समूहगीत, लोकनृत्य, मुकनाट्य, एकल गायन-वादन, सुगम संगीत, शास्त्रीय वाद्य, फोटोग्राफी, रांगोळी, मेंहदी, कातरकाम इत्यादी स्पर्धा होणार आहेत. शनिवारी समारोप होईल.

लोकमत



शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांच्या हस्ते बक्षीस स्वीकारताना शाहू कॉलेजचा विजयी संघ.

# शिवाजी विद्यापीठ विभागीय कबड्डी स्पर्धेत शाहू कॉलेज तृतीय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विभागीय क्रीडा परिषदद्वारा राधानगरी महाविद्यालय, राधानगरी व रयत शिक्षण संस्थेचे राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागात संपन्न झालेल्या विभागीय पुरुष कबड्डी स्पर्धेत शाहू कॉलेजने तृतीय क्रमांक प्राप्त केला.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे पार पडलेल्या कबड्डी स्पर्धेत एकूण २६ संघ सहभागी झाले होते.

या खेळाडूंना प्रा. संभाजी पाटील, आंतरराष्ट्रीय कबड्डी प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडीगिरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या यशाबद्दल सरोज पाटील, महाविद्यालय विकास समितीच्या चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या संगीता पाटील, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य प्रशांत पाटील, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, डॉ. डी. आर. भोसले यांनी अभिनंदन केले आहे. भोसले यांनी अभिनंदन केले आहे. (वा.प्र.)

पुढारी

# विद्यापीठातर्फे वस्तुसंग्रहालय पदविका अभ्यासक्रमासाठी ३० पर्यंत अर्ज मुदत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ इतिहास विभाग यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा असून प्रवेशाकरिता शैक्षणिक पात्रता ही कोणत्याही शाखेतील पदवी आहे.

वस्तुसंग्रहालयशास्त्र अभ्यासक्रमात संग्रहालयाचा इतिहास, संग्रहालय व्यवस्थापन, ऐतिहासिक वस्तुसंग्रह, प्राचीन वस्तूंचा अभ्यास, संग्रहालयातील वस्तूंची मांडणी, प्रदर्शन,वस्तूंचे दस्तावेजीकरण तसेच जतन आणि संवर्धन, संग्रहालयातील तंत्रज्ञानाचा वापर याबाबतचे ज्ञान देणारा हा अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमातून संग्रहालय संचालक, अभिरक्षक, चित्ररक्षक सहायक, व्यवस्थापक, कलादालन व्यवस्थापक, अशा अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. वस्तुसंग्रहालयशास्त्र पदविका अभ्यासक्रम विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, इतिहास अभ्यासक, संशोधक यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.

19 SEP 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी वसतिगृहाच्या पूर्ततेचे समाधान

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाच्या वसतिगृह इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदी मान्यवर.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारतीच्या पूर्ततेमुळे विद्यार्थ्यांची अनेक दिवसांची मागणी मार्गी लावल्याचे समाधान वाटत आहे, अशी भावना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात विविध महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आदी उपक्रमांसाठी संलग्नित महाविद्यालये आणि राज्यासह देशभरातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र इमारत असावी, अशी मागणी विद्यार्थ्यांतून होती. त्याची दखल घेत विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ही इमारत बांधण्यात आली. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. विभागाचे माजी संचालक डॉ. राजाराम गुरव यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल त्यांचेही कुलगुरूंनी अभिनंदन केले.

यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, वास्तुविशारद आदित्य बेगमपुरे, ठेकेदार संजय पाटील, आरसीसी कन्सल्टंट अभिजित देशमुख, विद्युत कंत्राटदार राम खन्नूकर यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, डॉ. गिरीश कुलकर्णी, उपकुलसचिव रणजित यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आर्डेकर, शिवकुमार ध्याडे आदी उपस्थित होते. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वसतिगृह इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले आदी उपस्थित होते.

# 'विद्यार्थी विकास'चे साकारले स्वतंत्र वसतिगृह

## विद्यापीठात महोत्सव, स्पर्धेसाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची सुविधा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठात विद्यार्थी विकास विभागाचे स्वतंत्र वसतिगृह साकारले असून त्याचे उद्घाटन आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. दीड वर्षात या वसतिगृहाचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात आला आहे. युवा महोत्सव, सांस्कृतिक स्पर्धांसाठी विद्यापीठात येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सुविधा त्याच्या माध्यमातून झाली आहे.

विद्यापीठात विविध महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रमांसाठी संलग्नित महाविद्यालये आणि राज्यासह देशभरातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र इमारत असावी, अशी मागणी विद्यार्थ्यांतून होती. त्याची दखल घेत विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारत बांधण्याचा निर्णय घेतला.

'विद्यार्थी विकास विभागासाठी एक देखणी आणि आदर्श अशी वास्तू उभारली आहे. ती विद्यार्थ्यांना निश्चित आवडेल. येथील निवास आणि सराव त्यांना नेहमी स्मरणात राहील', असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. या विभागाचे माजी संचालक डॉ. राजाराम गुरव यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याबद्दल कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्यांचे अभिनंदन केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, वास्तुविशारद आदित्य बेगमपुरे, ठेकेदार संजय पाटील, आरसीसी कन्सल्टंट अभिजित देशमुख, विद्युत कंत्राटदार राम खन्नूकर यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, या वसतिगृहाच्या इमारतीच्या तळमजल्याचे काम पूर्ण झाले असून तिचे क्षेत्रफळ ७७१.७९ चौरस मीटर इतके आहे. येथे एका डॉर्मिटरीसह एक उपाहारगृह आणि चार स्वच्छतागृहे आहेत. साठ विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय झाली आहे.

1 9 SEP 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांची मागणी पूर्ण केल्याचे समाधान

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : वसतिगृह इमारतीचे उद्घाटन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारतीच्या पूर्ततेमुळे विद्यार्थ्यांची अनेक दिवसांची मागणी मार्गी लावल्याचे समाधान वाटत आहे, अशी भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठात विविध महोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी उपक्रमांसाठी संलग्नित महाविद्यालये आणि राज्यासह देशभरातील विविध विद्यापीठांतील विद्यार्थी येत असतात. या विद्यार्थ्यांच्या निवास व्यवस्थेसाठी स्वतंत्र इमारत असावी, अशी मागणी विद्यार्थ्यांमधून होत होती. त्याची दखल घेत विद्यापीठाने विद्यार्थी विकास विभागासाठी स्वतंत्र वसतिगृह इमारत बांधण्याचा निर्णय घेतला. कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागाच्या वसतिगृह इमारतीचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. तानाजी चौगुले आदी.**

कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. रघुनाथ ढमकले, स्वागत परुळेकर, डॉ. राजाराम गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, उपकुलसचिव रणजीत यादव, अमित कांबळे, विजय पोवार, वैभव आर्डेकर, शिवकुमार ध्याडे आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता रोहित तोंदले, आदित्य बेगमपुरे, संजय पाटील, अभिजीत देशमुख, विद्युत कंत्राटदार राम खन्नुकर यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

तरूण भारत




गगनबावडा : येथील महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे स्वागत करताना प्राचार्य टी. एम. पाटील, सोबत संस्थापक प्रा. सतीश देसाई व अन्य.

# यशस्वीतेसाठी विद्यार्थ्यांनी बँकिंग क्षेत्राकडे वळावे

■ प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन

प्रतिनिधी
गगनबावडा

डीजीटल बँकींग सेवेमूळे शहर व ग्रामीण भागातील दरी कमी होऊ लागली आहे. बँकींग क्षेत्रातील नवनवीन संकल्पना आत्मसात कराव्यात. जीवनात यशस्वी होण्यासाठी योग्य करीअर करण्यासाठी विद्यार्थ्यांनी बँकिंग क्षेत्राकडे वळावे, असे आवाहन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले.

येथील डॉ. ग. गो. जाधव महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या द वेस्टर्न बँक्स लेट आर. एन. गोडबोले अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने रोल ऑफ डिजिटल बँकिंग इन इंडियन फिनान्शियल सिस्टम यावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. आयडीबीआय बँक मुंबई मुख्य शाखेचे असिस्टंट जनरल मॅनेजर डॉ. सुशांत सुतार यांची प्रमुख उपस्थिती होती.

बँकिंग क्षेत्रातील डिजिटल आणि तंत्रज्ञान या संबंधित नव संकल्पना, डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापरामुळे बँकिंग क्षेत्राचे बदललेले स्वरूप कसे आहे व कसे असेल याबाबत यांचा आढावा डॉ. सुतार यांनी घेतला. कार्यशाळेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष प्रा. सतीश देसाई यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या सचिव डॉ. विद्या देसाई, प्राचार्य डॉ. टी. एम पाटील, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. एस. एस. पानारी, आदिनाथ कांबळे, प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया घाटगे यांनी केले. आभार प्राध्यापक फरास यांनी मानले.

1 9 SEP 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जुन्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या पोर्टलवर उपलब्ध

## पाच हजारपेक्षा जास्त प्रश्नपत्रिकांचा समावेश : दहा रूपये सेवा शुल्क, विषयाचा कोड टाकल्यास डाऊनलोड होणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ अंतर्गत परीक्षांचा सराव करण्यासाठी पुर्वीच्या जुन्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जात आहेत. आत्तापर्यंत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जवळपास पाच हजार प्रश्नपत्रिका डाऊनलोड केल्या आहेत.**

शिवाजी विद्यापीठाच्या अधिकृत **https://sukapps.unishivaji.ac.in/sfcapp/#/login** या पोर्टलवरून जवळपास ८५४ विद्यार्थ्यांनी जुन्या प्रश्नपत्रिका डाऊनलोड करून घेतल्या आहेत. जुनी प्रश्नपत्रिका डाऊनलोड करण्यासाठी दहा रूपये सेवाशुल्क आकारले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचा परीक्षेचा सराव होऊन गुणवत्ता वाढवण्यास मदत होणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा विभागाला शंभर टक्के ऑनलाईन मोडवर नेण्याचा प्रयत्न सुरू आहे. विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या जुन्या प्रश्नपत्रिका कंज्युमर स्टोअरमधून विकत मिळत होत्या. त्यासाठी विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठात जावे लागत होते. परंतू आता विद्यार्थ्यांचा वेळ वाचणार असून घरबसल्या प्रश्नपत्रिका विद्यापीठाच्या पोर्टलवरून डाऊनलोड करता येणार आहेत. आतापर्यंत पाच हजार जुन्या प्रश्नपत्रिका पोर्टलवर उपलब्ध आहेत. आणखी प्रश्नपत्रिकांचे अपलोडिंग सुरू असून पाहिजे त्या जुन प्रश्नपत्रिका उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा खर्च, वेळ वाचणार आहे. पोर्टलवर विषय आणि विषयाचा कोड नंबर टाकून दहा रूपये ऑनलाईन शुल्क भरल्यास प्रश्नपत्रिका डाऊनलोड होते. यातून विद्यार्थ्यांचा परीक्षेचा सराव होऊन गुणवत्ता वाढवण्यास मदत होते. प्रश्नपत्रिकेचे स्वरूप समजल्यानंतर अभ्यास करणे सोपे जाते. त्यामुळे जुन्या विषयाच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन उपलब्ध करून दिल्या जात आहेत.

विद्यापीठातील परीक्षा विभाग शंभर टक्के ऑनलाईन मोडवर येण्याच्या प्रयत्नात आहे. पदवी व पदव्युत्तर विषयांच्या प्रश्नपत्रिका




अपलोडींग सुरू आहे. भविष्यात एम. फिल., पीएच. डी. अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका अपलोडींग केले जाणार आहे. जेणेकरून संशोधक विद्यार्थ्यांनाही या सुविधेचा लाभ घेता येईल. सर्व अभ्यास मंडळ ऑनलाईन मोडवर आणून सर्वच अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रिका तयार करून घेण्याचे काम प्राध्यापकांच्या लॉगईनमधून केले जाणार आहे. संबंधीत विषयाच्या प्राध्यापकांनी प्रश्नपत्रिका तयार करून ती आपल्या लॉगईनमध्ये अपलोड करून विद्यापीठाला ऑनलाईन पध्दतीने पाठवायची आहे. यातून प्राध्यापकांचा विद्यापीठात येण्याचा वेळ वाचणार आहे.

**शंभर टक्के ऑनस्क्रिन पेपर तपासणी करण्याचा मानस**

विद्यापीठाने परीक्षेशी निगडीत प्रश्नपत्रिका पाठवण्यापासून ते ऑनस्क्रिन पेपर तपासणीवर भर दिला आहे. आता शंभर टक्के ऑनस्क्रिन पेपर तपासणीचा विद्यापीठाचा मानस आहे. जुन्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन उपलब्ध करून दिल्यामुळे विद्यार्थ्यांचे काम सोपे झाले आहे.

**डॉ. अजितसिंह जाधव (संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ)**

### परीक्षा प्रमाद समिती ऑनलाईनवर

शिवाजी विद्यापीठातील परीक्षा प्रमाद समितीचे कामकाज ऑनलाईन पध्दतीने केले जाणार आहे. भरारी पथकाने यंदा ऑनलाईन पध्दतीने कॉपी केसेसची नोंद केली आहे. ८७५ अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी जवळपास अडीज हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षांसाठी नियुक्त भरारी पथकाने ८७४ तक्रारींची नोंद केली आहे.

### कमी मनुष्यबळात परीक्षा विभागाचे कामकाज

राज्य शासनाने नोकरभरती न केल्याने परीक्षा विभागात फक्त ७० अधिकारी आणि कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे फारच कमी मनुष्यबळ परीक्षा विभागाकडे उपलब्ध असूनही परीक्षा विभागाचे कामकाज चांगल्या पध्दतीने करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

Times of India

# In significant leap, SUK enters top 50 state public varsities in NIRF '25

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University has maintained its position among the top 200 universities across India in the National Institutional Ranking Framework (NIRF) 2025 rankings, with the university making a significant leap to rank among the top 50 state public universities in the country.

Pro-VC Dr Pramod Patil said, "Last year, Shivaji University was included in the rank band of 51-100. This year, Shivaji University has moved further in the ranking and has secured a place in the rank band of 1-50. The university has now reached the 45th spot among the top 50 universities across the country with a score of 51.80."

Savitribai Phule Pune University is at the 11th spot, Mumbai University is at the 12th position and CoEP Technological University, Pune, at the 43rd position in state public university rankings.

File photo



Shivaji University, Kolhapur

SUK vice-chancellor Dr Digambar Shirke said, "Even though the number of participating comprehensive educational institutions is increasing, Shivaji University has increased its position in this ranking. This is the result of the efforts of all departments including teachers and researchers of the university to improve their performance in the last few years as per the NIRF criteria."

The National Institutional Ranking Framework (NIRF) is based on the criteria of teaching-learning process, research and professional activity, student pass rate, efforts made to reach various disadvantaged sections of society including women, and communication and coordination with various stakeholders related to the university.

Along with universities and colleges, the ranking also includes educational institutions in the fields of research institutes, engineering, management, pharmacy, architecture and planning, medical, dental, law, agriculture and allied sectors, innovation, open, skill, state public and sustainable development.